

रयत शिक्षण संस्थेचे,

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली)

## ता. पलूस, जि. सांगली

मंगळवार, दि. १७ मे, २०२२

## मराठी विभाग

## प्रा. डॉ. एन. डी. पाटील स्मृतिप्रीत्यर्थ व्याख्यानमाला

## विषय - प्रा. डॉ. एन. डी. पाटील : सत्यशोधक, समाजवादी व सत्याग्रही

## वक्ते – प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील

### अहवाल

शेतकरी आणि कष्टकऱ्यांचे कैवारी, कृतिशील विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांचे स्मृतिप्रीत्यर्थ प्रत्येक महिन्याच्या १७ तारखेला महाविद्यालयाच्या वतीने व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते. प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या कार्याची महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनींना ओळख व्हावी, या उद्देशाने सदर व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते.

या उपक्रमातील दुसरे व्याख्यान मा. प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील यांचे झाले. 'प्रा. डॉ. एन. डी. पाटील : सत्यशोधक, समाजवादी व सत्याग्रही' या विषयावर बोलताना डॉ. टी. एस. पाटील म्हणाले, ''महात्मा जोतिबा फुले यांचे सत्यशोधकीय विचारांचा आधार घेत समाजातील बहुजन कष्टकरी वर्गाचे प्रश्न सोडविण्याचे प्रामाणिक प्रयत्न प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी केला. महात्मा फुले आणि महात्मा गांधी यांना अभिप्रेत असणारे सत्य अंगिकारत त्यांनी आपले लोकलढे यशस्वी केले. सर्वसामान्य शेतकरी आणि शिक्षण हे त्यांच्या चिंतनाचे आस्थाविषय होते.'' कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम लाभले होते. अध्यक्षीय मनोगतात त्यांनी प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या विचारांचे आजच्या काळातील प्रस्तुतता स्पष्ट केली. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालय विकास समितीचे सदस्य आणि कृष्णाकाठ उद्योग समूहाचे संस्थापक-अध्यक्ष जे के. (बापू) जाधव सदिच्छ भेट दिली.

सदर कार्यक्रम यशास्वीपणे पार पाडण्यासाठी मराठी विभागाने विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. तेजस चव्हाण यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. स्वाती मगदूम यांनी केला. आभार उपप्राचार्य डॉ. काकासाहेब भोसले यांनी मानले; तर सूत्रसंचालन डॉ. अश्विनी तातुगडे यांनी केले.

**निष्पत्ती :** महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या कार्याचे महत्त्व कळाले.

**लाभार्थी :** ९६





विभागप्रमुख
मराठी विभाग

प्राचार्य
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली)